जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 DEC 2020
तरुण भारत

# प्र – कुलगुरुपदी डॉ. पी. एस. पाटील

## विद्यापीठाचे विद्यार्थी असणारे ७ वे प्र कुलगुरु : संशोधनावर विकासावर भर देणार - डॉ. पाटील

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील पदार्थविज्ञान अधिविभागाचे प्रमुख प्रा. डॉ. प्रमोद शंकरराव तथा पी. एस. पाटील यांची गुरुवारी विद्यापीठाच्या प्र–कुलगुरूपदी निवड करण्यात आली. राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती भगतसिंह कोश्यारी यांच्या कार्यालयाकडून या नियुक्तीची माहिती विद्यापीठ प्रशासनाला देण्यात आली. शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थी असलेले डॉ. पाटील हे सातवे प्र–कुलगुरू आहेत. या निवडीबद्दल कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी नवनियुक्त प्र. कुलगुरु प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांचे अभिनंदन केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे नूतन प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचे अभिनंदन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे.

दुंडगे (ता. चंदगड) येथे दि. ९ जानेवारी १९६५ रोजी जन्मलेल्या डॉ. पाटील यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण सांगली येथे झाले. तेथीलच विलिंग्डन महाविद्यालयातून त्यांनी पदार्थविज्ञान विषयात बी. एस्सी. केली. त्यानंतर शिवाजी विद्यापीठातून त्यांनी एम.एस्सी. व पीएच.डी. पूर्ण केली. डॉ. पाटील हे विद्यापीठात सुमारे ३० वर्षे अध्यापन व संशोधन करीत आहेत. त्यांनी विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता म्हणून काम केले आहे.

शिवाजी विद्यापीठात दर्जेदार व गुणवत्तापूर्ण अध्ययन, अध्यापन प्रणाली आणि विशेषतः संशोधन विकासावर भर देण्याचा आपला प्रयत्न राहील. नजीकच्या काळात विद्यापीठ नॅक मानांकनाच्या प्रक्रियेला सामोरे जात आहे. त्या दृष्टीने संघबांधणी आणि क्षमता वर्धन या बाबींवर तातडीने भर देण्यात येईल. विद्यापीठातील शिक्षक, संशोधकांसह सर्वच घटकांचे सहकार्य लाभेल, असा विश्वास प्र. कुलगुरु प्रा. डॉ. पाटील यांनी व्यक्त केला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 DEC 2020
पुढारी

# डॉ. पी. एस. पाटील शिवाजी विद्यापीठाचे नवे प्र-कुलगुरू



**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील पदार्थविज्ञान अधिविभागाचे प्रमुख प्रा. डॉ. प्रमोद शंकरराव तथा पी. एस. पाटील यांची शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरूपदी निवड करण्यात आली आहे.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या निवडीनंतर प्र-कुलगुरू कोण होणार याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले होते. विद्यापीठ विकास आघाडीच्या वतीने काही नावे कुलगुरूंना देण्यात आली. त्यानंतर आलेल्या नावांची यादी कुलपती कार्यालयास पाठविण्यात आली. कुलगुरू व राज्यपाल यांच्या समन्वयातून नवीन प्र-कुलगुरूंचे नाव निश्चित करण्यात आले. राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती भगतसिंह कोश्यारी यांच्या कार्यालयाकडून गुरुवारी सायंकाळी ई-मेलद्वारे त्यांच्या नियुक्तीची माहिती विद्यापीठ प्रशासनास प्राप्त झाली. शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थी असलेले डॉ. पाटील हे विद्यापीठाचे सातवे प्र-कुलगुरू आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 DEC 2020

पुढारी

# प्र-कुलगुरू डॉ. पाटील विद्यापीठाचेच विद्यार्थी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान अधिविभागाचे प्रमुख प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांची प्र-कुलगुरू पदी निवड झाली आहे. प्रा. डॉ. पाटील हे विद्यापीठाचे विद्यार्थी आहेत.

दुंडगे (ता. चंदगड) येथे ९ जानेवारी १९६५ रोजी जन्मलेल्या डॉ. पाटील यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण सांगली येथे झाले. विलिंग्डन महाविद्यालयातून त्यांनी पदार्थविज्ञान विषयात बी. एस्सी. केली. विद्यापीठातून एम.एस्सी. व पीएच.डी. पूर्ण केली. डॉ. पाटील विद्यापीठात ३० वर्षे अध्यापन, संशोधन करीत आहेत.

> शिवाजी विद्यापीठात दर्जेदार व गुणवत्तापूर्ण अध्ययन, अध्यापन प्रणाली आणि विशेषतः संशोधन विकासावर भर देण्याचा प्रयत्न राहील. विद्यापीठ नॅक मानांकनाच्या प्रक्रियेला सामोरे जात आहे. त्या दृष्टीने संघ बांधणी व क्षमतावर्धन या बाबींवर भर देण्यात येईल.
>
> **- डॉ. पी. एस. पाटील,**
> नूतन प्र-कुलगुरू

अमेरिकेतील स्टॅनफॉर्ड विद्यापीठातर्फे जगभरातील आघाडीच्या संशोधकांची क्रमवारी जाहीर केली. त्यात डॉ. पाटील हे अप्लाईड सायन्समध्ये देशातील पाचवे तर जगातील ३९१ क्रमांकाचे आघाडीचे संशोधक ठरले आहेत. निवडीबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## कुलगुरू, प्र-कुलगुरू कोल्हापूरचे

डॉ. पाटील यांचा कुलगुरू पदासाठीच्या पहिल्या टप्प्यातील मुलाखतीसाठी २५ जणांमध्ये समावेश होता. मात्र, त्यांची पहिल्या पाचमध्ये निवड झाली नाही. विद्यापीठाकडून तीन नावांची कुलपती कार्यालयाकडे शिफारस केली. त्यातून डॉ. पाटील यांची निवड केली. त्यांच्या निवडीने विद्यापीठास कुलगुरू व प्र-कुलगुरू कोल्हापूर जिल्ह्यातील मिळाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

11 DEC 2020
पुण्यनगरी

# डॉ. प्रमोद पाटील शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरुपदी

कोल्हापूर : प्रतिनिधी

येथील शिवाजी विद्यापीठातील पदार्थविज्ञान अधिविभागाचे प्रमुख प्रा. डॉ. प्रमोद शंकरराव तथा पी. एस. पाटील यांची गुरुवारी शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरुपदी निवड करण्यात आली. महाराष्ट्राचे राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती भगतसिंह कोश्यारी यांच्या कार्यालयाकडून सायंकाळी ई-मेलद्वारे या नियुक्तीची माहिती विद्यापीठ प्रशासनाला प्राप्त झाली. शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थी असलेले डॉ. पाटील हे विद्यापीठाचे सातवे प्र-कुलगुरू आहेत.



दुंडगे (ता. चंदगड) येथे दि. ९ जानेवारी, १९६५ रोजी जन्मलेल्या डॉ. पाटील यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण सांगली येथे झाले. तेथीलच विलिंग्डन महाविद्यालयातून त्यांनी पदार्थविज्ञान विषयात बी.एस्सी. केली. त्यानंतर शिवाजी विद्यापीठातून त्यांनी एम.एस्सी. व पीएच.डी. पूर्ण केली. डॉ. पाटील हे विद्यापीठात सुमारे ३० वर्षे अध्यापन व संशोधन करत आहेत.

संशोधन विकासावर भर पान ४ वर

11 DEC 2020

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दर्जेदार अध्ययन, संशोधन विकासावर भर

## नूतन प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरुपदावर आपली निवड केल्याबद्दल आणि विश्वास दाखविल्याबद्दल कुलपती भगतसिंह कोश्यारी आणि कुलगुरु डॉ. डी. डी. शिर्के यांच्याप्रती डॉ. पी. एस. पाटील यांनी कृतज्ञता व्यक्त करत ते म्हणाले, शिवाजी विद्यापीठात दर्जेदार व गुणवत्तापूर्ण अध्ययन, अध्यापन प्रणाली आणि विशेषतः संशोधन विकासावर भर देण्याचा माझा प्रयत्न राहील. नजीकच्या काळात विद्यापीठ नॅक मानांकनाच्या प्रक्रियेला सामोरे जात आहे. त्या दृष्टीने संघबांधणी आणि क्षमता वर्धन या बाबींवर तातडीने भर देण्यात येईल. विद्यापीठाची एनआयआरएफ, वर्ल्ड क्यू. एस. रँकिंग इत्यादी विविध मानांकनांच्या क्रमवारीत वृद्धी करण्यासाठीचे प्रयत्न येत्या काळात महत्त्वाचे ठरणार आहे. त्यासाठी विद्यापीठातील शिक्षक, संशोधकांसह सर्वच घटकांचे सहकार्य लाभेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्र-कुलगुरुपदी निवड झालेले डॉ. पाटील यांनी विद्यापीठाच्या



विविध अधिकार मंडळांवर त्यांनी प्रभावी कामगिरी बजावली आहे. त्यांनी विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता म्हणून काम केले आहे. पदार्थविज्ञान अधिविभागाचे प्रमुख म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे प्रभारी संचालक म्हणून ते काम पाहत आहेत. अमेरिकेतील स्टॅनफॉर्ड विद्यापीठातर्फे नुकतीच जगभरातील आघाडीच्या संशोधकांची जी क्रमवारी जाहीर केली, त्यामध्ये डॉ. पाटील हे अप्लाईड सायन्समध्ये देशातील पाचवे, तर जगातील ३९१ क्रमांकाचे आघाडीचे संशोधक ठरले आहेत. सन २०१८ मध्ये मटेरियल सायन्स विषयातील देशातील टॉप १० संशोधकांमध्ये त्यांची गणना झाली. त्यांना आऊटस्टँडिंग रिसर्च फॅकल्टी पुरस्कार प्राप्त झाला आहे. सुमारे ६ कोटी रुपयांच्या संशोधन प्रकल्पांवर त्यांनी काम केले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ४५ विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे. त्याचप्रमाणे त्यांचे सुमारे ५०० आंतरराष्ट्रीय शोधनिबंध प्रकाशित आहेत. जर्मनीमधील डॅड फेलोशीप आणि दक्षिण कोरियातील ब्रेनपूल फेलोशीप या प्रतिष्ठित फेलोशीप त्यांना मिळाल्या आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 DEC 2020
लोकमत

# पी. एस. पाटील यांची प्र-कुलगुरूपदी निवड

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरूपदी प्रा. डॉ. प्रमोद शंकरराव तथा पी.एस. पाटील यांची गुरूवारी नियुक्ती झाली. ते पदार्थविज्ञान अधिविभागाच्या प्रमुखपदी कार्यरत आहेत. -वृत्त/२

11 DEC 2020 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरूपदी पी. एस. पाटील

## कुलपतींकडून नियुक्ती : पदभार स्वीकारला

■ लोकमत न्यूज नेटवर्क



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरूपदी प्रा. डॉ. प्रमोद शंकरराव तथा पी. एस. पाटील यांची गुरुवारी नियुक्ती झाली. ते सध्या विद्यापीठातील पदार्थविज्ञान अधिविभागाच्या प्रमुखपदी कार्यरत आहेत. त्यांच्या प्र-कुलगुरूपदावरील नियुक्तीचा ई-मेल सायंकाळी पाच वाजता कुलपती भगतसिंह कोश्यारी यांच्या कार्यालयाकडून विद्यापीठ प्रशासनाला मिळाला.

विद्यापीठाचे विद्यार्थी असलेल्या डॉ. पाटील यांनी सातवे प्र-कुलगुरू म्हणून पदभार स्वीकारला. या पदावरील नियुक्तीसाठी आठजण इच्छुक होते. त्यातील तीनजणांची नावे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी गेल्या महिन्यात कुलपतींना पाठविली होती. त्यानंतर गुरुवारी या पदावर डॉ. पाटील यांची नियुक्ती झाल्याची माहिती कुलपती कार्यालयाकडून विद्यापीठाला कळविण्यात आली. डॉ. पाटील यांचे मूळ गाव दुंडगे (ता.चंदगड) आहे. त्यांचे प्राथमिक, माध्यमिक शिक्षण सांगली येथे झाले. विलिंग्डन महाविद्यालयातून त्यांनी पदार्थविज्ञान विषयात बी.एस्सी. केली. त्यानंतर विद्यापीठातून त्यांनी एम.एस्सी. आणि पीएच.डी. पूर्ण केली. त्यांना अध्यापन, संशोधनाचा ३० वर्षांचा अनुभव आहे.

### असे होते इच्छुक

प्र-कुलगुरुपदासाठी इच्छुक असलेल्या आठजणांनी कुलगुरु डॉ. शिर्के यांच्याकडे बायोडाटा दिले होते. त्यात डॉ. पाटील यांच्यासह प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे, प्रा. डॉ. भारती पाटील, पी. एम. चौगुले, आर. आर. कुंभार, आर. जी. सोनकवडे, सी. जे. खिलारे, आदींचा समावेश होता.

शिवाजी विद्यापीठात गेली ३० वर्षे मी कार्यरत आहे. संशोधनात विद्यापीठाला गती मिळवून देण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केला. त्यात यशस्वी झालो. गेली पाच वर्षे अधिष्ठातापदी काम केल्याने मला प्रशासनाचा अनुभव आहे. प्र-कुलगुरुपदाच्या माध्यमातून विद्यापीठात दर्जेदार व गुणवत्तापूर्ण अध्ययन, अध्यापन प्रणाली आणि विशेषतः संशोधन विकासावर भर देण्याचा माझा प्रयत्न राहील.

**- डॉ. पी. एस. पाटील**

जनसंपर्क कक्ष
11 DEC 2020 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्र-कुलगुरुपदी डॉ. पी. एस. पाटील

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १० : शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरुपदी भौतिकशास्त्र विभागातील डॉ. पी. एस. पाटील यांची निवड झाली. ते सातवे प्र-कुलगुरू असून, विज्ञान शाखेतील पाचवे आहेत.



डॉ. पी. एस. पाटील

कुलगुरुपदी डॉ. डी. टी. शिर्के विराजमान झाल्यानंतर प्र-कुलगुरू कोण होणार, याची उत्सुकता होती. डॉ. पाटील यांनी कुलगुरुपदासाठी अर्ज केला होता. मात्र, पहिल्याच फेरीत त्यांचा अर्ज फेरीतून बाहेर पडला. परिणामी प्र-कुलगुरू पदावर विद्यापीठ आवारातील की, संलग्नित एखाद्या महाविद्यालयातील प्राध्यापकाची वर्णी लागणार, हा विषय चर्चेत होता. त्यांच्या निवडीचे वृत्त कळताच अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले. डॉ. पाटील यांनी शिवाजी विद्यापीठातून बी. एस्सी. व एम.एस्सी.चा अभ्यासक्रम पूर्ण केला. ते १९९० ला न्यू कॉलेजमध्ये लेक्चरर म्हणून रुजू झाले. त्यानंतर ते १९९५ ला फिजिक्स विभागात कार्यरत झाले. त्यांचे आंतरराष्ट्रीय स्तरावर २१९, राष्ट्रीय २५ व राज्य स्तरावर ११ शोधनिबंध प्रसिद्ध झाले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली २८ विद्यार्थ्यांनी पीएच.डी. मिळवली असून, १४ विद्यार्थी पीएच.डी.चे संशोधन करत आहेत. चार विद्यार्थी एम. फिल. झाले आहेत. स्कूल ऑफ नॅनो सायन्सचे समन्वयक म्हणून ते सध्या काम पाहत आहेत.

## यापूर्वीचे प्र-कुलगुरू व त्यांचा कालावधी :

- डॉ. के. आर. यादव (९ एप्रिल १९९१ ते २१ सप्टेंबर १९९२)
- डॉ. व्ही. के. घाटे (२० जुलै १९९३ ते १५ जून १९९५)
- डॉ. एन. बी. पाटील (१६ डिसेंबर १९९६ ते ३१ ऑक्टोबर २०००)
- डॉ. व्ही. एम. चव्हाण (९ एप्रिल २००१ ते ११ मार्च २००४)
- डॉ. ए. एस. भोईटे (१५ सप्टेंबर २०१२ ते २६ फेब्रुवारी २०१५)
- डॉ. डी. टी. शिर्के (११ ऑगस्ट २०१७ ते २०२०)



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 DEC 2020
लोकमत

# एम. एस्सी.ची प्रवेश प्रक्रिया आजपासून

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील अधिविभाग आणि संलग्नित महाविद्यालयांमधील एम. एस्सी. भाग एक आणि अधिविभागातील एम. ए., एम. कॉम., आदी अभ्यासक्रम भाग एकची प्रवेश प्रक्रिया आज, शुक्रवार ते दि. २२ डिसेंबरपर्यंत चालणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 DEC 2020
तरुण भारत

# महावीर अध्यासन केंद्राच्या राष्ट्रीय चर्चासत्राचा समारोप

**कोल्हापूर :** भगवान महावीर अध्यासन केंद्र शिवाजी विद्यापिठ आयोजित, आचार्य श्री शांतीसागर महाराज, मानवतेचे दिपस्तंभ या दोन दिवशीय राष्ट्रीय चर्चा सत्राचा समारोप दिगंबर जैन बोर्डींगमध्ये झाला. यावेळी अनिल पाटील, वीर सेवा दलाचे चेअरमन शशिकांत राजोबा यांच्या उपस्थितीत या चर्चासत्राचा समारोप झाला.

या चर्चसत्रात राजोबा यांनी सागितले, महाराष्ट्र ही संताची भूमी असून शिवाजी विद्यापीठ भगवान महावीर यांच्या विचारास प्राधान्य देत आहे. ही बाब अभिमानाची आहे. या चर्चासत्रात डॉ. पुरंधर चौगुले यांचे सल्लेखना, डॉ. पद्मजा पाटील यांचे शांतिसागर महाराज यांचा पदविहार, हा शोध निबंध त्यांनी सादर केला. पहिल्या सत्रात प्रा. डी. ए. पाटील यांचे लठ्ठे यांच्या १४२ व्या जन्मदिनानिमित व्याख्यान झाले. चर्चासत्राचे प्रास्ताविक समन्वयक डॉ. विजय ककडे यांनी केले. यावेळी डॉ. जे. एफ. पाटील, प्राचार्य श्रीधर हेरवाडे, प्रा. डी. पाटील, एन. एन. पाटील, अनिल पाटील, आदी उपस्थित होते.